जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५५२ दिनांक -१५/०७/२०२३**

शिवाजीनगर पोलीस स्टेशन पुणे शहर

# लोखंडी कटरच्या धाकाने वाटसरुना लुटणा-या टोळीला केले जेरबंद

फिर्यादी हे दि. ०८/०७/२०२३ रोजी मध्यरात्री चे सुमारास शिवाजी पुतळा चौक येथील निर्मला ॲटोमोबाईल्स येथे बसले असताना दुचाकी वरून आलेल्या तीन अनोळखी इसमानी त्यांना कटरचा धाक दाखवून त्यांच्या खिश्यातील मोबाईल फोन व रोख रक्कम बळजबरीने काढुन घेतली म्हणुन शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नंबर १३८/२०२३ भादवि कलम ३९२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील दाखल गुन्हयाचा तपासाबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक प्रताप साळवे व स्टाफ यांनी गुन्हयातील घटनास्थळी भेटी देवून तेथील गोपनीय साक्षीदारकडे सखोल चौकशी करून तसेच पोलीस हवालदार रणजित फडतरे यांनी यातील आरोपी आलेल्या व घटनास्थळावरून गेलेल्या मार्गावरील १५० ते २०० सीसीटीव्ही फुटेज चेक करून गुन्हयातील अनोळखी आरोपीची ओळख निश्चीत केली. त्यास अनुसरुन नमुद पथकाने दिं. ११/०७/२०२३ रोजी त्यातील एका विधीसंघर्षीत बालकास ताब्यात घेतले त्यास विश्वसात घेवून त्याच्या साथीदारांची संपुर्ण माहिती प्राप्त केली व त्यांचा शोध चालु केला.

मा. पोलीस आयुक्त पुणे शहर यांच्या आदेशाने दिंनाक १४/०७/२०२३ रोजी २२/०० वाजता चालु केलेल्या कोंम्बीग ऑपरेशन दरम्यान पोलीस हवालदार प्रविण राजपुत यांना यांच्या खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, नमुद गुन्हयातील वाटसरुना लुटणा्या टोळीतील पाहिजे आरोपी दळवी हॉस्पीटल येथे थांबलेला आहे. सदरची बातमी.वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांना कळविल्यावर त्यांनी तात्काळ कारवाई करण्याचे आदेश दिंल्याने सदर ठिकाणी जावून वरील स्टाफने तो पळुन जाण्याच्या तयारीत असताना शिताफीतीने पकडले व पुढील तपास कामी पोलीस स्टेशन येथे आणले. त्याच्याकडे केलेल्या तपासात त्याने त्याचे **नाव विनायक गणेश कापडे वय- २१ वर्षे,रा.एसआरए बिल्डींग ई/७०१ ,युमनानगर विमाननगर पुणे** असे सांगुन त्याचा मित्र मंगेश काकडे व एक विधीसंघर्षीत बालक यांच्या मदतीने सदरचा गुन्हा केल्याचे कबुल केले. तपासा दरम्यान त्यांनी जबरी चोरी केलेला फिर्यादीचा मोबाईल फोन हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशीक विभाग,श्री.प्रविणकूमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०१,पुणे शहर श्री.संदीपसिंग गिल्ल, मा.सहा पोलीस आयुक्त, विश्रामबाग विभाग, पुणे शहर श्री.रमेश कुंवर, यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अरविंद माने,पोलीस निरीक्षक, (गुन्हे) विक्रम गौड ,तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक प्रताप साळवे ,तपासी अधिकारी अर्जुन नाईकवाडे,सपोफौ भिवरे,पोलीस अंमलदार रणजित फडतरे,प्रविण राजपुत, साठे, सय्यद यांनी केली आहे.


महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
पुणे शहर पोलीस
शिवाजीनगर पोलीस ठाणे
दुरध्वनी क्रमांक - ०२० २५५३६२६३
अधिसुचना
ठाणे अंमलदार